महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १० वे दिनांक : २९/१२/२०२५ वार : सोमवार

# गौतम भाई मोठ्या भावासारखे : सुप्रिया सुळे



**बारामती** : "गौतम भाई आणि प्रीती भाभी हे माझ्यासाठी केवळ पाहुणे नसून, ते माझ्या हक्काच्या मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत. गेल्या 30 वर्षांपासून आमचे प्रेमाचे आणि विश्वासाचे नाते आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अदानी कुटुंबाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे स्वागत करताना त्या बोलत होत्या.

बारामतीमध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरचे आज उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य पाहुणे म्हणून गौतम अदानी हे उपस्थित होते. यावेळी गौतम अदाणी यांच्या पत्नी देखील सोबत होत्या. त्याचबरोबर शरद पवारांसह अजित पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरच्या उद्घाटनावेळी सुप्रिया सुळे यांनी गौतम अदाणी यांच्या कार्याचे कौतुक केले.

**नेमके काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?**

सुप्रिया सुळे यांनी बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे मनापासून स्वागत केले. 'गौतम भाई आणि प्रीती भाभी माझ्यासाठी मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत, असे म्हणत त्यांनी अदानी कुटुंबाशी असलेल्या ३० वर्षांच्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, कधी आयुष्यात चांगली, गोड किंवा कडुही बातमी मी हक्काने कुठल्या भावाला सांगते, तर या भावाला (गौतम अदाणी) सांगते. कधी कधी ते मला हक्काने रागावतातही, तर कधी माया देखील करतात. असे आमचे प्रेमाचे आणि विश्वासाचे नाते आहे. आज गौतम भाई देशात नाही, तर जगामध्ये यशस्वी झालेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. गौतम भाईंचा सुरुवातीपासूनच संघर्ष आम्ही कुटुंब म्हणून फार जवळून पाहिलेला आहे.

**एआयच्या युगात 'मायेची थाप' महत्त्वाची**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर (AI) भाष्य करताना सुप्रिया सुळे यांनी तंत्रज्ञान आणि मानवी संवेदना यांची तुलना केली. "आजच्या युगात कॉम्प्युटर कितीही प्रगत झाला, तरी तो कधीही शिक्षकाची जागा घेऊ शकणार नाही. कारण तो संस्कार आणि मायेची थाप देऊ शकत नाही. तसेच संसदेतील भाषणांसाठी चॅट जीपीटीचा वापर कसा होतो, याचाही त्यांनी किस्सा सांगितला. अदानी ग्रुप आणि विद्या प्रतिष्ठान यांच्यातील कराराद्वारे संशोधन आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**अजित पवारांकडूनही गौतम अदाणींचे कौतुक**

गौतम भाई नेहमीच बारामतीत येतात. पवार साहेबांना दिवाळी शुभेच्छा द्यायला ते येतात. त्यांचे आज पुन्हा बारामतीत आगमन झाले त्यांचे तमाम बारामतीकरांकडून मी मनापासून स्वागत करतो. प्रत्येकाच्या आयुष्यात सुरुवात होते. लोकं मोठे झाल्यावर आरोप करतात, टीका-टिप्पणी करतात पण आपण आपले काम करत राहायचे असते. माझ्या माहितीप्रमाणे 1990 च्या दशकात ही एमआयडीसीची 40 एकर जागा घेतली आणि नक्षत्र उद्यानसह टप्प्याटप्प्याने विकासकामे होत गेली. आज मानाचा तुरा त्यात रोवला गेलाय. ते 'शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या केंद्राचे उद्घाटन होय. ज्याची खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील तरुण तरुणांसाठी गरज होती. असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले.

**शरद पवार हे माझे मार्गदर्शक- गौतम अदाणी**

"शरद पवारांना गेल्या तीन दशकांहून अधिक काळ ओळखणे हे माझे भाग्य आहे आणि त्यांच्याकडून मी जे काही शिकलो ते अतुलनीय आहे. ज्ञानापलीकडे, त्यांची समजूतदारपणा आणि सहानुभूती ही सर्वात खोलवरची छाप सोडते. मी अनेक वेळा बारामतीला भेट दिली आहे आणि शरद पवार यांनी येथे जे साध्य केले आहे ते विकासापेक्षा खूप जास्त आहे. त्यांच्यासारखा नेता चांगले राजकारण काय असते हे दाखवतो. त्यांनी शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणले आहे, सहकारी संस्थांना बळकटी दिली आहे आणि उद्योजकतेला चालना दिली आहे," असे गौतम अदाणी यांनी म्हटले.

# अमरावतीत शिवसेना-भाजपची युती तुटली

**अमरावती** : राज्यात मुंबईसह अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना एकत्र निवडणूक लढवत असताना, अमरावतीमध्ये मात्र या 'महायुती'ला सुरुंग लागला आहे. जागावाटपाच्या मुद्द्यावरून दोन्ही पक्षांमधील चर्चेचा अडसर दूर होऊ शकला नाही, परिणामी अमरावती महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना शिंदे गटाने अमरावती महापालिकेच्या एकूण ८७ जागांपैकी २५ जागांची आग्रही मागणी भाजपकडे केली होती. मात्र, भाजपने हा प्रस्ताव पूर्णपणे नाकारला. भाजप केवळ १५ ते १६ जागा शिवसेनेला सोडण्यास तयार होती. जागांच्या या आकड्यावरून दोन्ही पक्षांत एकमत होऊ शकले नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असतानाच युती तुटल्याने कार्यकर्त्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

**अभिजीत अडसूळ यांच्या भूमिकेकडे लक्ष**

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते अभिजीत अडसूळ आज सायंकाळी एक महत्त्वाची पत्रकार परिषद घेणार आहेत. या परिषदेत ते युती तुटण्याचे नेमके कारण स्पष्ट करण्याची आणि पक्षाची पुढील रणनीती जाहीर करण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या या पवित्र्यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**फडणवीसांनी दर्शवली होती सकारात्मकता**

दरम्यान, अमरावती महानगरपालिका निवडणूक महायुती म्हणूनच लढवली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले होते. जागा वाटपाबाबत स्थानिक नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा अंतिम टप्प्यात असून, लवकरच याबाबत निर्णय जाहीर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला होता. मात्र, आज जागावाटपाच्या तिढ्यामुळे अमरावतीत भाजप शिवसेना युती तुटली.

# दोन गुजराती आपल्याला गिळायला निघालेत : उद्धव ठाकरे



**मुंबई** : राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून 15 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केली असून, मुंबईसह राज्यातील महापालिकांमध्ये आता 'ठाकरे' बंधूंचा करिष्मा पाहायला मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती टीका करतानाच, कार्यकर्त्यांना एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. "दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले असताना आपण जर आपसात भांडत बसलो, तर ही लढाई न लढलेलीच बरी," अशा शब्दांत त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे भाजपविरोधात कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले, "भाजपला महाराष्ट्रात कोणी ओळखत नव्हते, आम्ही त्यांना राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाडी नेले. आम्ही ज्यांना मोठे केले, आज तेच आमच्यावर वार करत आहेत. भाजपने केवळ युती तोडली नाही, तर ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. इतकी वर्षे ज्यांनी आपला केवळ उपयोग करून घेतला, त्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे."


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ डिसेंबर २०२५


# कन्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनुभला निसर्गरम्य गौताळा



**कन्नड (अरुण थोरात):** निसर्ग संवर्धना सह वन्यजीवांच्या जीवनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी आणि त्यांना वन्यजीव सृष्टीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथील 'राष्ट्रीय हरित सेना' व सामाजिक वनीकरण विभाग, परिक्षेत्र कार्यालय, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने गौताळा अभयारण्यात एक दिवसीय निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते.सहाय्यक वन्यजीव रक्षक सचिन शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद काटकर, वनपाल नितीन घोडके, वनरक्षक रुपाली राठोड, वनरक्षक संध्या खाडे यांनी विद्यार्थ्यांना अभयारण्यातील जैवविविधतेची सविस्तर माहिती दिली. तसेच अभ्यारण्यातील दुर्मिळ वनस्पती, औषधी झाडे आणि विविध पक्ष्यांच्या प्रजातीचे जवळून निरीक्षण केले. वॉंच टॉवरवरून विद्यार्थ्यांनी निसर्गाचे विहंगम दृश्य अनुभवले आणि ऐतिहासिक 'सीतान्हाणी'परिसराची माहिती जाणून घेतली. पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेत व वनभोजनाचा आनंद घेऊन निसर्ग सहलीची सांगता करण्यात आली.यावेळी हरित सेना प्रमुख पुरुषोत्तम बागुल, विजय भोसले, सुभाष गोरे, संजय त्रिभुवन, रामनाथ टेकाळे, मीनाक्षी पवार, आकाश शिरसाठ, मीरा गर्जे, वनरक्षक गोपीनाथ सपकाळ, साईदास पवार, सुनील खरडे, अंकुश गोरे, देऊबा गायकवाड, वनमजूर श्री. घुगे सह हरित सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# गौतम उंदिरवाडे यांना वनस्पती शास्त्र विषयात पीएच.डी.



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय च्या संशोधन विभागाचे संशोधक विद्यार्थी श्री गौतम उंदिरवाडे यांना वनस्पती शास्त्र विषयात प्रा डॉ. गणेश भ. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या " इंड्यूस्ड म्युटेशनल अँड बायो केमिकल्स स्टडीज इन हैसिंथ बीन्स (लॅब लॅब पर्पुरीयस एल.) स्वीट" या विषयावरील संशोधन प्रबंधास पीएचडी करिता "कोकण भूषण आणि कोकण वाल 2" या दोन वाल च्या वाणावर केलेल्या संशोधना साठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मान्यता दिली आहे. त्यांच्या या यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री पुरुषोत्तमजी बागडिया, सचिव श्री श्रीनिवास जी भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ. उमेश मोगले तसेच प्राचार्य डॉ. प्रसाद मदन , राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे , तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# 'शोध : खऱ्या आईचा' या कादंबरीचे प्रकाशन



**शिरूर कासार :** निसर्गाकडून मिळणाऱ्या नात्यापेक्षा मानलेलं अथवा जोडलेलं नातं हे निखळ,निस्सीम आणि श्रेष्ठ असू शकतं व ते निसर्गावर सुद्धा मात करू शकतं हे नवोदित लेखिका कु.वर्षा भाबड यांनी 'शोध: खऱ्या आईचा' या कादंबरीतून साधार स्पष्ट केले आहे. शिरूर (कासार) जि.बीड, येथे भरलेल्या '7 वे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन' प्रसंगी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील,साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.अमर हबीब, साहित्यिक डॉ.दादा गोरे,पद्मश्री शब्बीर(मामू)सय्यद,सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सुशीलाताई मोराळे,कथाकार डॉ.भास्कर बडे कार्यवाहक मा.दगडू लोमटे, ह.भ.प. विवेक शास्त्री महाराज,मा.नवनाथ सानप,बालसाहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव इत्यादी मान्यवरांच्या हस्ते या कादंबरीचे प्रकाशन मोठ्या थाटात संपन्न झाले.यावेळी मराठी साहित्यिक, साहित्य रसिक व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ डिसेंबर २०२५


## इकरा पब्लिक स्कूलने SQAAF मूल्यांकनात उत्कृष्ट कामगिरी करत 'ए' ग्रेड मिळवला






**जळगाव:** इकरा पब्लिक स्कूलने राज्य शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र यांच्याद्वारे आयोजित 'शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा'(SQAAF) मूल्यांकनात 'ए' ग्रेड मिळवून एक उल्लेखनीय यश संपादन केले आहे.जे शिक्षणातील उत्कृष्टतेप्रती असलेल्या तिच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे.या मूल्यांकनासाठी, एक क्लस्टर अधिकारी, दोन मुख्याध्यापक आणि एक शिक्षणतज्ञ यांचा समावेश असलेल्या प्रतिष्ठित शिक्षण तज्ञांच्या पथकाने इकरा पब्लिक स्कूलला भेट देऊन SQAAF च्या विविध पैलूंची बारकाईने तपासणी केली.शाळेची निष्ठा आणि कठोर परिश्रम फळाला आले असून,तिला प्रतिष्ठित 'ए' ग्रेड मिळाला आहे. इकरा पब्लिक स्कूलचे हे यश डॉ.करीम सालार यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली दर्जेदार शिक्षणाच्या अथक प्रयत्नांचे एक ज्वलंत उदाहरण आहे.ही कामगिरी केवळ शाळेसाठीच नव्हे,तर संपूर्ण समाजासाठी अभिमानाचा क्षण आहे.

## नको करू मित्रा

नको करूस मित्रा,इतकी प्रतिष्ठेची हाव
उधळ पाणी करते, नेहमी खळखळाट
संथ त्या सागराला,जाऊन एकदा विचार
किती लाव्हा पोटामध्ये,सामावला बघ आज

कविता ही व्यक्त होते,होऊनी भावना छान
नसते कधी दोन शब्दाची, चारोळी लहान
ही साधना पवित्र अन् तीर्थक्षेत्र महान
नतमस्तक होता मिळे ,सरस्वतीचे वरदान

दोन ओळी लिहिल्या, म्हणून नको गाजावाजा
अनुभवाचा लेखाजोखा, असते खरी कविता
वेदनेच्या सागरातील, अमृतवाणी कविता
जीवन वाटेवरील,उजेड असते कविता

समाजाला मार्ग दावण्या, पुढे सदा कविता
कष्टकरी शोषिताचा,आवाज पहिला कविता
कुणब्याचे दुःख मांडते, शब्दात आता कविता
जगण्याचं बळ देते, इथे प्रत्येकास कविता.

म्हणून सांगतो पुन्हा, माझ्या प्रिय मित्रा
सृजनाची धरुनी कास,मांड भोगलेल्या वेदना
रडू नको हसूनी पाहा, या गोड जगताला
लेखणी हातात घेऊनी, साद घाल कवितेला.



ज्ञानेश्वर गायके, कन्नड






## नाताळच्या सलग सुट्ट्यांमुळे वेरूळ परिसरात पर्यटकांची व भाविकांची प्रचंड गर्दी



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : नाताळ ख्रिसमस ची सुट्ट्या त्यातच पुढे आणखी सलग सुट्ट्या आल्याने खुलताबाद दौलताबाद म्हैसमाळ वेरूळ परिसरात पर्यटकांनी व भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती परिसरात अर्ध्या घाटापर्यंत वाहने पार्कींगला लावली होती आणी जिकडे तिकडे वाहनांसह पर्यटकांची प्रचंड गर्दीच दिसून आली. सुट्ट्या असल्यामुळे वेरूळ लेणी येथे भाविक व पर्यटकांची प्रचंड गर्दी दिसून आली ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी तसेच जगप्रसिद्ध वेरूळ लेणी बघण्यासाठी हजारो भाविक पर्यटकांनी वेरूळमध्ये गर्दी केली होती त्यामुळे वेरूळ खुलताबाद कागजीपुरा दौलताबाद घाटात तसेच लेणी समोर महावीर स्तंभ येथे वाहतुकीचे कोंडी वारंवार सुरू होती या वाहतूकोंडीमुळे भाविकांना व पर्यटकांना, प्रवाशांना मोठा मनस्ताप त्रास सहन करावा लागला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ डिसेंबर २०२५

# नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ




डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आणि चळवळीचा नाशिक जिल्ह्याशी अत्यंत निकटचा आणि जिव्हाळ्याचा संबंध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच नाशिकमध्ये जातीव्यवस्थेवर व धर्माव्यवस्थेवर काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून हल्ले चढविले आहेत. इथल्या शूद्र अतिशूद्रांना आणि बहुजन समाजाला माणूसपणाचे जिने जगता यावे, त्यांना माणूस म्हणून समानतेने वागणूक मिळावी, ज्या धर्माने आणि जातीने बंधने घालून इथल्या माणसाचे माणूसपण हिरावून घेतले या सर्व गोष्टीला उधळून लावण्यासाठी आणि देव, धर्माच्या नावाखाली बहुजन समाजाला अंधश्रद्धा, कर्मकांड, अज्ञानाच्या मोहजाळातून बाहेर काढण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील येवला या ठिकाणी'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'ही घोषणा करून इथल्या धर्मांध आणि जातीय मानसिकतेवर हल्ला चढवला. नाशिक जिल्हा व जिल्ह्यातील इतर ठिकाणीही विविध सभा घेऊन कार्यकर्त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनी प्राणपणाने आंबेडकरी चळवळीसाठी झोकुन दिले आहे. योगदान दिले आहे. या सर्व गोष्टीची जाण आणि भान या नवीन पिढीला, वाचकांना, कार्यकर्त्याला यावी आणि त्यांच्यापासून प्रेरणा आणि ऊर्जा मिळावी म्हणून लेखक, विचारवंत प्रा. गौतम निकम आणि वैशाली निकम यांनी नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ खंड एक या पुस्तकाचे अत्यंत महत्त्वाचे काम हाती घेऊन ग्रंथरूपाने संपादित करून प्रकाशित केला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचा ऐतिहासिक दस्तऐवज वाचकांना मिळाला आहे.तो निश्चितच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि संशोधनात्मक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि उपयोगी ठरणार असुन प्रेरणादायी आहे.'नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ खंड १ ' हा ग्रंथ प्रा. गौतम निकम व वैशाली निकम यांनी विमलकीर्ती, प्रकाशन चाळीसगाव च्या माध्यमातून ग्रंथरूपाने वाचकासमोर ठेवला आहे. या ग्रंथाची एकूण चार प्रकरणात मांडणी केली असून तो ग्रंथ एकुण सहाशे सत्याऐंशी पानाचा आहे. लेखक प्रा. गौतम निकम हे स्वतः आंबेडकरी चळवळीत कार्यरत असल्याने आणि वडिलांकडून घरातच आंबेडकरी चळवळीचे बाळकडू मिळाले असल्याने आंबेडकरी चळवळीचे आकलन त्यांना असल्याने या ग्रंथाचे मोल अधिक आहे. ते स्वतः प्राध्यापक असल्याने सतत मनन,चिंतनामुळे त्यांचे जवळजवळ ऐंशीच्यावर वैचारिक,दलित ,आदिवासी, चरित्र अशा विविध विषयावरील ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. खान्देशातील आंबेडकरी चळवळीचे तीन खंड प्रकाशित केल्यानंतर आता हा ' नाशिक जिल्ह्यातील आंबेडकर चळवळ खंड एक ' प्रकाशित करून वाचकाला एक नवीन वैचारिक,प्रेरणादायी, उर्जादायी मेजवानी मिळाली आहे.'नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळी संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रव्यवहार'या पहिल्या प्रकरणात नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीत कार्यरत असणारे जे कार्यकर्ते होते त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून जी जाणीव जागृती घडवून आणली याबाबतचा तपशील यामध्ये देण्यात आला आहे. त्याचबरोबर कार्यकर्त्यांनी काय काय करावे व काय काय करू नये किंवा विविध प्रकारच्या आंदोलनाचा आणि सत्याग्रहाचा मजकूरही पत्ररूपाने पाठवून जे मार्गदर्शन केले आहे तेही यामध्ये दिले आहे. दादासाहेब उर्फ भाऊराव गायकवाड यांना डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक पत्रे म्हणजे एकूण जवळजवळ एकशे त्रेषष्ठ पत्रे पाठवून चळवळ व समाज जागृतीसाठी माहिती दिली आहे. त्याचबरोबर काही कार्यकर्त्यांनी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जी पत्रे पाठवली आहेत यांचाही यामध्ये समावेश आहे. नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह १९३० ते १९३५ पर्यंत म्हणजे जवळजवळ पाच वर्ष वेगवेगळ्या स्वरूपात चालला होता. या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊराव उर्फ दादासाहेब गायकवाड यांना अनेक मार्गदर्शन पत्रे लिहिली आहेत यांचाही समावेश या प्रकरणात केला आहे. त्याचबरोबर येवला जिल्हा नाशिक येथे मुंबई इलाखा दलित परिषद डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली १३ ऑक्टोंबर १९३५ साली भरली होती. यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय आला होता. या परिषदेतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ' मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'अशी घोषणा केली होती. या सर्व बाबींचा जो पत्रव्यवहार केला आहे तो या पहिल्या प्रकरणांमध्ये दिला आहे. त्याचबरोबर यातील काही पत्रांची सुरुवात'जय भवानी'या शब्दाने केलेली दिसते. यातील काही पत्रे इंग्रजी मधूनही लिहिलेली आहेत. या सर्व पत्रांचा आढावा पहिल्या प्रकरणांमध्ये घेतलेला दिसून येतो आहे. दुसऱ्या प्रकरणात 'आंबेडकरी चळवळीतील दुर्मिळ दस्ताऐवज'घेतलेला आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक जिल्ह्यातील जे काही दौरे केले आहेत त्या दौऱ्याच्या निमित्ताने जे काही कार्यकर्ते त्यांना भेटले किंवा विविध ठिकाणी त्यांच्या ज्या काही सभा झाल्या, परिषदा घेतल्या त्या संदर्भातील फोटो व भाषणांचा वृत्तांतही दुसऱ्या प्रकरणात दिलेला आहे. अस्पृश्यता निवारण करण्यासंदर्भात १९ जानेवारी १९२८ त्र्यंबकेश्वर येथे यात्रा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण दिले त्याचबरोबर काळाराम मंदिर सत्याग्रह करणाऱ्यांना प्रतिबंध करताना व अटक करताना पोलीस किंवा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहासंबधीचे फोटोही यामध्ये दिले आहेत. अनंत गद्रे, अमृतराव रणखांबे आणि इतर सत्याग्रही यांचीही फोटो देऊन नाशिक जिल्ह्यातील मुखेडचा सत्याग्रह करताना अमृतराव रणखांबे, विठ्ठलराव रणखांबे, पतीतपावनदास, सावळीराम दाणी या पुढाऱ्यांचेही फोटो दिले आहेत. काही पत्रकांचाही यामध्ये समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम मनमाड उद्घाटन यासंबंधीची माहिती पत्रके ही यामध्ये दिली आहेत.तिसऱ्या प्रकरणात'नाशिक जिल्ह्यातील आंबेडकर पूर्व, आंबेडकर कालीन आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्यांचे समर्पित जीवन कार्य'(१८७४-१९४२) घेतले आहेत. त्यामध्ये गणपत दादा मोरे, दत्तात्र्य भोसले, पुंजाजी जाधव, थोरात रावसाहेब, देवराम डांगळे, रूपाजी पगारे, अमृतराव रणखांबे, शंकर गायकवाड, गहिनाजी संसारे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, रखमाबाई राजे, गणपतराव जाधव, भीमराव करडक, दामोदर अहिरे, सीताबाई दादासाहेब गायकवाड, किसन गंगाराम हिरे, शाहीर केरुजी घोंगडे, लक्ष्मणराव खडताळे, जीजी तथा गीताबाई गायकवाड, शिवराम दोंदे, मंजुळाबाई वाघ, शांताबाई दाणी, महाकवी वामनदादा कर्डक, जयवंतराव उबाळे, परीट गुरुजी, मोतीराम काफडे अशा आंबेडकरी चळवळीशी निगडित असणाऱ्या विविध जातीतील कार्यकर्त्यांच्या जीवनावर प्रकाश पडावा म्हणून एकूण निवडक 61 जणांचे जीवन कार्य या प्रकरणात घेतले आहे.चौथ्या प्रकरणात ' नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ'संदर्भात किंवा काळाराम मंदिर सत्याग्रह, विविध घेतलेल्या परिषदा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे या संदर्भातील ज्या काही महत्त्वपूर्ण गोष्टी असतील त्या सर्व मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत मध्ये प्रकाशित केलेल्या आहेत. त्या सर्व प्रकाशित झालेला वृत्तांत या चौथ्या प्रकरणात दिलेला आहे.एकंदरीत ' नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ खंड १' हा ग्रंथ प्रा. गौतम निकम व वैशाली निकम यांनी संपादित केलेला असुन त्यातील भाषाशैली व आशय पूर्ण केलेली मांडणी निश्चितच सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक दृष्ट्या उपयुक्त असणारी आहे. हा ग्रंथ संशोधकालाही निश्चितच उपयोगी पडणारा असून नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचा जाज्वल्य इतिहास तरुणांना, वाचकांना, कार्यकर्त्यांना आणि संशोधकांना मार्गदर्शन करणारा ठरेल. या ग्रंथाचे मुखपृष्ठही संतुक गोलेगावकर यांनी अतिशय देखणे काढले असल्यामुळे पुस्तक आकर्षक वाटायला लागले आहे. अनेक कार्यकर्त्यांना त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीला बळ देण्यासाठीही हा ग्रंथ उपयुक्त ठरेल.

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर ता.साक्री जि.धुळेमो.९४२३३९७४८४

नाशिक जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ खंड -१
**लेखक : प्रा. गौतम निकम, वैशाली निकम**
विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव
पृष्ठे: ६८७, मूल्य:१००० रु.



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा. व मा विदयालय मुकुंदवाडी, शाळेतील मु.अ. श्री चौधरी सर व सर्व शिक्षक वृंद राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील (NMMS)विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा अतिशय सुरळीतपणे पार पडली.... केंद्र संचालक श्री. पारधे सर यांनी अभिनंदन सर्व संघांचे कौतुक केले.....



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २९ डिसेंबर २०२५

# जैविक विविधता : मानवी भवितव्याचा अनिवार्य आधार

२९ डिसेंबर रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन हा केवळ पर्यावरणीय जाणीव जागविणारा औपचारिक दिवस नसून तो मानवी समाजाच्या अस्तित्वाशी, संस्कृतीशी आणि शाश्वत भविष्यासोबत अतूटपणे जोडलेला आहे. जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवरील सर्व सजीवसृष्टीतील वैविध्य, वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव, त्यांच्या प्रजाती, जनुकीय वैशिष्ट्ये आणि त्यांना आधार देणाऱ्या परिसंस्था होय. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता जैविक विविधता ही केवळ निसर्गशास्त्रीय संकल्पना नसून मानवी समाजरचना, आर्थिक व्यवहार, सांस्कृतिक मूल्ये आणि राजकीय निर्णय यांचा आरसा आहे. समाज निसर्गाशी जसा वागतो, तशीच त्याची विचारसरणी, सत्तासंबंध आणि विकासाची दिशा स्पष्ट होत जाते.मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासूनच निसर्ग आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी राहिले आहे. आदिम समाजात मानव पूर्णतः निसर्गावर अवलंबून होता. अन्न, पाणी, निवारा, औषधे आणि संरक्षण यासाठी जैविक विविधता हाच त्याचा आधार होता. त्यामुळे जंगल, नदी, पर्वत, वृक्ष आणि प्राणी यांना पवित्र मानण्याची परंपरा विकसित झाली. या श्रद्धांमागे अंधविश्वास नव्हे, तर निसर्गसंवर्धनाची सामूहिक सामाजिक जाणीव होती. भारतीय समाजातील लोकसंस्कृती, सण-उत्सव, व्रते, परंपरा आणि लोककथा या निसर्गाशी घट्ट जोडलेल्या आहेत. वड, पिंपळ, तुळस, नाग, गाय यांना दिलेले पावित्र्य हे जैविक विविधतेचे संरक्षण करणारे सामाजिक-सांस्कृतिक साधन होते. समाजाने निसर्गाशी संघर्ष न करता सहजीवनाचा मार्ग स्वीकारला होता.कृषी संस्कृतीच्या उदयानंतर जैविक विविधतेचे सामाजिक महत्त्व अधिक दृढ झाले. पिकांची विविधता, स्थानिक बियाणे, मातीची सुपीकता, पावसाचे चक्र आणि हवामान यावर समाजाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य अवलंबून होते. प्रत्येक प्रदेशाने आपल्या भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांनुसार शेतीपद्धती विकसित केल्या. विविध पिके, स्थानिक जाती आणि पारंपरिक शेतीपद्धती यामुळे समाज संकटांना तोंड देऊ शकत होता. समाजशास्त्र सांगते की विविधता ही केवळ परिसंस्थेची नव्हे, तर समाजाच्या टिकावाची मूलभूत अट आहे. एकसुरीपणा निसर्गात जितका धोकादायक आहे, तितकाच तो समाजासाठीही घातक ठरतो.मात्र औद्योगिक क्रांतीनंतर निसर्ग आणि समाज यांचे नाते मूलभूतपणे बदलले. उत्पादनक्षमता, औद्योगिकीकरण, बाजारव्यवस्था, नफा आणि उपभोग या संकल्पनांनी विकासाची व्याख्या ठरवली. जंगलतोड, खाणउद्योग, मोठे धरण प्रकल्प, रासायनिक शेती, औद्योगिक प्रदूषण आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे जैविक विविधतेचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता हा ऱ्हास केवळ पर्यावरणीय प्रश्न नसून सामाजिक विषमतेचा परिणाम आहे. विकासाच्या नावाखाली काही मोजके घटक समृद्ध झाले, तर त्याची किंमत गरीब, ग्रामीण, आदिवासी आणि वंचित समाजांना मोजावी लागली. जैविक विविधतेचा ऱ्हास म्हणजे केवळ प्रजातींचा नाश नव्हे, तर उपजीविकेचा ऱ्हास, सांस्कृतिक विस्थापन आणि सामाजिक असुरक्षिततेची प्रक्रिया आहे.आदिवासी समाज आणि जैविक विविधता यांचे नाते विशेष उल्लेखनीय आहे. जंगल हे आदिवासींसाठी केवळ संसाधन नसून त्यांचे घर, उपजीविकेचे साधन, सामाजिक ओळख आणि आध्यात्मिक विश्व आहे. अन्नसंकलन, पारंपरिक शेती, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लोककथा, गीतं आणि धार्मिक श्रद्धा या सर्वांचा आधार जैविक विविधतेवर आहे. त्यामुळे अनेक अभ्यासक आदिवासी समाजाला जैविक विविधतेचा नैसर्गिक संरक्षक मानतात. परंतु आधुनिक विकासाच्या नावाखाली या समाजांना विस्थापन, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागला. जंगलांचे राष्ट्रीयीकरण, औद्योगिक प्रकल्प, खाणकाम आणि वन्यजीव अभयारण्यांच्या धोरणांमुळे त्यांच्या पारंपरिक हक्कांवर गदा आली. समाजशास्त्र या प्रक्रियेला ‘विकासाच्या नावाखाली होणारा सामाजिक अन्याय’ असे संबोधते.जैविक विविधता आणि मानवी उपजीविका यांचे नाते अतिशय घट्ट आहे. जगातील कोट्यवधी लोक अन्न, औषधे, इंधन, चारा, मासेमारी आणि रोजगारासाठी थेट निसर्गावर अवलंबून आहेत. पारंपरिक औषधपद्धती, लोकवैद्यक आणि आयुर्वेद हे जैविक विविधतेच्या ज्ञानावर उभे आहेत. मात्र आधुनिक औद्योगिक व्यवस्था, पेटंट कायदे आणि व्यापारी हितसंबंधांमुळे या पारंपरिक ज्ञानाला दुय्यम स्थान देण्यात आले. परिणामी अनेक वनस्पती प्रजाती नष्ट होत आहेत आणि त्याचबरोबर पिढ्यान्पिढ्या चालत आलेले लोकज्ञानही लुप्त होत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही केवळ पर्यावरणीय हानी नसून सांस्कृतिक दारिद्र्याची प्रक्रिया आहे.शहरी समाज अनेकदा स्वतःला निसर्गापासून वेगळे समजतो, परंतु प्रत्यक्षात शहरांचे अस्तित्वही जैविक विविधतेवरच अवलंबून आहे. पाणी, अन्न, हवा आणि ऊर्जा यासाठी शहरे ग्रामीण भाग आणि नैसर्गिक परिसंस्थांवर विसंबून असतात. तरीही शहरीकरणामुळे हिरवळी नष्ट होतात, नद्या प्रदूषित होतात, ओढे बुजवले जातात आणि स्थानिक प्रजाती लुप्त होतात. वाढते तापमान, पूर, दुष्काळ, प्रदूषणजन्य आजार आणि मानसिक तणाव हे त्याचे थेट परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की निसर्गापासून तुटलेपण ही आधुनिक समाजाची गंभीर समस्या आहे आणि ती सामाजिक तणाव, विषमता व असुरक्षितता वाढवते.जागतिक पातळीवर जैविक विविधतेचे राजकारणही तितकेच महत्त्वाचे आहे. जैविक संसाधनांवर कोणाचा हक्क, त्यातून होणाऱ्या नफ्याचे वाटप आणि संरक्षणाची जबाबदारी हे प्रश्न सत्तासंबंधांशी जोडलेले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या जैविक संसाधनांचे व्यापारीकरण करतात, तर स्थानिक समुदायांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. ‘जैव-चोरी’ ही संकल्पना याच अन्यायातून उदयास आली आहे. समाजशास्त्रीय विश्लेषण जागतिक असमानता, उत्तर-दक्षिण दरी आणि पर्यावरणीय शोषण यांचा परस्परसंबंध स्पष्ट करते.जैविक विविधतेच्या संरक्षणात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक समाजांमध्ये महिलाच बियाणे जतन करतात, पाणी व्यवस्थापन करतात, अन्नसंकलन आणि पारंपरिक औषधज्ञान जपतात. मात्र निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. पर्यावरणीय धोरणांमध्ये आणि स्थानिक व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे म्हणजे केवळ जैविक विविधतेचे संरक्षण नव्हे, तर सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. समाजशास्त्र लिंगभाव आणि पर्यावरण यातील घनिष्ठ नाते अधोरेखित करते.आज हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जैविक विविधतेचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर आले आहे. विविध प्रजाती आणि परिसंस्था हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवतात. मात्र जैविक विविधतेचा ऱ्हास ही क्षमता कमी करतो आणि नैसर्गिक आपत्ती अधिक तीव्र होतात. त्याचा फटका सर्वाधिक गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना बसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही परिस्थिती ‘पर्यावरणीय अन्याय’ दर्शवते, जिथे संकटे सर्वांनी निर्माण केलेली असतात, पण त्याची किंमत काही मोजक्यांनाच मोजावी लागते.आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन साजरा करताना केवळ भाषणे, घोषणा किंवा औपचारिक कार्यक्रम पुरेसे नाहीत. विकासाची संकल्पना पुन्हा तपासण्याची गरज आहे. अमर्याद उपभोग, निसर्गाचे शोषण आणि तात्कालिक नफा याऐवजी शाश्वतता, समतोल, सामाजिक न्याय आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था, माध्यमे, संशोधन संस्था आणि सामाजिक चळवळी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जैविक विविधतेविषयी संवेदनशीलता निर्माण करणे म्हणजे निसर्गाशी मानवी नात्याचे पुनर्निर्माण करणे होय.समारोप करताना असे म्हणावे लागेल की जैविक विविधता ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असली तरी तिचे भविष्य मानवी समाजाच्या हातात आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोन आपल्याला हे शिकवतो की निसर्ग आणि समाज यांचे नाते केवळ उपयोगाचे नसून नैतिक जबाबदारीचे आहे. जर आपण आज जैविक विविधतेचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलो, तर त्याची किंमत येणाऱ्या पिढ्यांना मोजावी लागेल. म्हणूनच आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन हा केवळ स्मरणदिन न राहता निसर्ग, समाज आणि मानवतेच्या शाश्वत भविष्याचा सामूहिक संकल्प करण्याचा दिवस ठरावा, हीच काळाची आणि समाजाची खरी गरज आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com